# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८३/२०२२ नि.क्र.०१ खालील आदेश

(बँक ऑफ इंडिया वि. बापू गायकवाड, व.)

१. प्रस्तूतचा अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम ३९ प्रमाणे नियमित दिवाणी दावा क्र.५७३/२०१६ मधील हुकूमनामा अंमलबजावणीकरीता दिवाणी न्यायालय क. स्तर, कराड, जि. सातारा यांच्याकडे वर्ग करण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतच्या प्रकरणातील अर्जदार बँक ही नियमित दिवाणी दावा क्र. ५७३/२०१६ मध्ये वादी व जाबदार हे प्रतिवादी होते. अर्जदार यांनी जाबदार यांच्याविरुध्द रक्कम रु.१,४५,७०२.६२/– व्याजासह वसूलीकरीता प्रस्तूतचा दावा केला होता. त्याचा निकाल होवून तो मंजूर करण्यात आला. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी वादी बँकेस रक्कम रु.१,४५,७०२.६२/– व त्यावर दावा दाखल तारखेपासून ते रक्कम पूर्ण वसूल होईपावेतो द.सा.द.शे.६ टक्के दराने व्याजासह संपूर्ण रक्कम देण्याचा आदेश झाला. सदर प्रकरणतील जाबदार हे कासार शिरंबे, ता. कराड, जि. सातारा येथील रहिवाशी असून, ते दिवाणी न्यायालय क. स्तर, कराड या न्यायालयाच्या अधिकारीतेच्या स्थानिक मर्यादेमध्ये असल्याने, प्रस्तूत दरखास्त त्या न्यायालयाकडे वर्ग करणे न्याय व योग्य होईल. सबब, मी खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. नियमित दिवाणी दावा क्र.५७३/२०१६ मधील हुकूमनामा अंमलबजावणीकरीता मा. दिवाणी न्यायालय क. स्तर, कराड जि. सातारा यांच्याकडे नियमानुसार पुर्ततेवर वर्ग करण्यात यावा.

२. त्यानुसार, प्रकरण वर्ग प्रमाणपत्र नियमानुसार देण्यात यावे.

PRADEEPSINGH PRUTHVIRAJSINGH THAKUR
Digitally signed by PRADEEPSINGH PRUTHVIRAJSINGH THAKUR
Date: 2023.08.19 17:45:06 +0530

इस्लामपूर.
दिनांक १९/०८/२०२३

**(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)**
३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
इस्लामपूर